**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**
(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)
**National Service Scheme**

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्रं. No.GU/NSS/ 229 /2024 Dt : 03/06/2024

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:– दिनांक ०५ जुन २०२४ रोजी होणाऱ्या जागतीक पर्यावरण दिनानिमीत्य विविध उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ:– महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
क्रमांकः रासेयो –२०२४/प्र.क्र ४२/रासेयो कक्ष दिनांक ३१.०५.२०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये सविनय या प्रमाणे आहे कि, जागतिक पर्यावरण दिन हा एक जागतिक कार्यक्रम असून दरवर्षी ५ जून रोजी पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी, जागतिक पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या क्रियाकापांविरूध्द आवाज उठविण्यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील अनेक लोक एकत्र येतात आणि पर्यावरण रक्षणासाठी एकत्र काम करतात.

यावर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्य राष्ट्रीय सेवाा योजनेमार्फत ''आमची जमीन'' या घोषवाक्याखाली जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिरोधकता यावर लक्ष केंद्रित केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व कार्यक्रम समन्वयक आणि कार्यक्रम अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे की, विद्यापीठातंर्गत रासेयो महाविद्यालयात यावर्षी खालील कृती व्दारे जागतिक पर्यावरण दिन साजरा करावा आणि आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित विवरण पत्रात दिनांक ९ जून पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना विभाग गोंडवाना विद्यापीठ, येथे सादर करावा.

जागतिक पर्यावरण दिना दिवशी करावयाचे उपक्रम.

१) महाराष्ट्रामध्ये साध्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. याकरिता पाणी संवर्धनासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमामध्ये जसे चरी काढणे, तलाव – विहरी स्वच्छ करणे, छोटे डॅम बांधणे यामध्ये सर्व रासेयो स्वयंसेवकांनी सहभागी होणे.

२) प्राप्त पाण्याचा जपून वापर करण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणारे पथनाटय, प्रबोधन कार्यक्रम, गृह भेटी, ईत्यादी सारखे उपक्रम राबविणे.

३) पाणी वाचवण्याचा सवयी जसे की गळके नळ दुरूस्त करणे ज्याव्दारे पाणी वाया जाणार नाही, दात साफ करताना आणि दाढी करताना भांडयामध्ये पाणी घेणे, अंघोळीसाठी शॉवरचा वापर न करणे, सांडपाणी जमिनीत मुरवण्यासाठी शोषखड्डा तयार करणे, वॉशिंग मशीनचा त्याच्या पूर्ण क्षमतेनुसार वापर करणे, आपल्या कल्पकतेनुसार पर्यावरण व पाण्याची बचत बाबत विविध उपक्रम राबविणे.

<u>विहित विवरणपत्र</u>

विद्यापींठाचे नावः–

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | राबविण्यात आलेले उपक्रम | सहभागी स्वयंसेवकांची संख्या | सहभागी लोकांची संख्या | वाचविण्यात आलेले पाणी लिटर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.